विषय ........ग्रंथ
सं. क्र. २१२८
REFBK-0018851
REFBK-0018851

# सूर्यसप्तक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 91020 वि. काव्य
क्रमांक 2920 नों. दि. 11/12

वामन इंगळे

REFBK-0018851
REFBK-0018851

सुनंदा पब्लिकेशन काटोल; जि. नागपूर.

सूर्यसप्तक

कवि : वामन इंगळे

प्रकाशक : सुनंदा पब्लिकेशन
काटोल, जि. नागपूर.

(C) सौ. विजया इंगळे,
काटोल जि. नागपूर.

मुद्रक : अशोक ठाकरे,
सुनंदा प्रिन्टर्स, काटोल.

पुस्तक प्रकाशनाची तारीख
१-६-१९७३

आवृत्ती : पहिली

सजावट
श्री. नीलकांत ढोले; श्री. विठ्ठलराव जगदळे.

( मूल्य पांच रुपये )

# अर्पण

मूर आणि फ्रेडी या परस्परांच्या आणि पीडित
मानवजातीच्या चिरंजीव मित्रांच्या स्मृतीला

वामन इंगळे

# माझे दोन शब्द-

१९५५ ते १९७३ या कालखंडात मी दीडकशे कविता लिहिल्यात. या संग्रहांत त्यांपैकीं साठेक कविता अंतर्भूत केल्या आहेत. पद्मश्री उस्ताद अब्दुल हलीम जाफरसाहेब कविवर्य विंदा करंदीकर; श्री पुरूषोत्तम दारव्हेकर; श्री फ. मु. शिंदे आदि मित्रांनी संग्रह काढण्यासाठी अर्थ सहाय्य केले. काही मित्रांनी सहाय्याची आश्वासनें देऊन ठेवली. प्रकाशनव्यवसायांतील एकूण अडचणी स्थिती आणि 'राजकारण' लक्षात घेता काव्यसंग्रह स्वत:च प्रकाशित करण्याची हिंमत केली. वर उल्लेख केलेल्या मित्रांच्या स्नेहातून जरी नाही तरी ऋणातून मुक्त होण्याची माझी प्रामाणिक इच्छा आहे. त्या दृष्टिने रसिक वाचक मला सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे.

या वीस वर्षांच्या कालखंडात जीवनाकडे पाहण्याच्या माझ्या दृष्टींत भलेबुरें फेरफार झालेत. पण आधीपासूनच जी सामाजिक जाणीव माझ्याजवळ होती तिचा विकास झाला की काय हें तर मी सांगू शकत नाही; पण तिचा आध्यात्मिक नॉशिया येण्याऐवजी मला तिच्यांत आधार सापडला हें सांगता येऊं शकेल. स्वातंत्र्यानंतर या देशांत भांडवलशाहीने केलेला थोडा फार विकास दिसला. त्यांतून सामान्य माणसाच्या जीवनाचा आशय बदललेला दिसला नाही. तो प्रत्यक्षांत उध्वस्थ होताना दिसला. काही सन्मान्य वगळले तर या पडझडीची जाणीव मराठी कवितेंत फारशी दिसली नाही. बहुतेकांनी तिला अनवश्यक राजकारण समजून स्वत:च्या कवितेंतून बुद्धया दूर ठेवली. हे समाजकारण बाहेरचे जीवन असून त्यानेच आंतल्याही जाणीवेला निर्माण केलें आहे. ही वस्तुथिती मला नाकारता आली

नाही. तिला कवितेंत व्यक्त करताना मी कधी फॅंटसी; हरवासी पद्धतीचे नाटचमय निवेदन तर कधी रूपक कथेला जवळ असणाऱ्या फॉर्मचाही आधार घेतला. प्रत्येक कविता होतानाची मनस्थिती आठवायला लागलो तर वास्तवाला अधिक प्रखर करण्याच्या उद्देशानेच मी हें सारें केलें होते हें आतां स्पष्ट आठवते. तो हेतु किती सफल झाला हें रसिक वाचक ठरवीतील. त्यांतूनही एक गोष्ट सांगितली पाहिजे - ती ही की एखाद्या अव्याख्य अनुभवाचा अविष्कार मला करावयाचा आहे या हेतूतून ही कविता झालेली नाही. मोर पिसातील रंग; आकाशातील विविध रंग या बाबीही अनेकदां अव्याख्य होताना दिसतात. कवितेंत येऊं शकणारी अव्याख्यता एकतर शद्वांचा उपयोग स्वर आणि रंगासारखा केला तर येऊं शकते अथवा एका इंद्रियाला जाणवणारी संवेदना दुसऱ्याही इंद्रियाला जाणवली पाहिजे या काहीशा चमत्कारिक अपेक्षेतूनही येऊं शकते.

संगीत ऐकताना आनंद होतो. पण त्यामुळे जीवनांतील खरी द्वंद्व निरास पावत नाहीत. कॉडवेल संगीताच्या प्रभावाचं वर्णन 'A massage in which tragic cnflicts of life are not solved' असे करतो. हें कॉडवेलचें म्हणणें मान्यच आहे. पण एक आहे. तो संगीताच्या एक्झागरेटेड शक्तिविरुद्ध बोलतो आहे. संगीत ही कला म्हणून अनवश्यक आहे असे तो म्हणत नाही. आपण ज्या एका आदर्श स्थितीसाठी प्रयत्न करीत आहोत त्याही स्थितींत संगीत राहील. नव्हे त्याचा परमोच्च विकास होईल; आणि तो होत ही आहे. कला ही मानवी आकांक्षांची अभिव्यक्ति साधते आणि मानवी आकांक्षा परत कलेचा विकास करतात. रागचित्रांनी त्या स्वरबंदिशीतील ताण आणि अर्थाच्या काही एका व्यूहासोबतच त्या त्या कलावंताच्या विशिष्टतेबद्दलही बोलावे अशी अपेक्षा मी माझ्या रागचित्रांजवळून करतो आहे.

या संग्रहांत समाविष्ट झालेल्या कविता जेंव्हा नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या होत्या त्यावेळी काही कविता समजत नाहीत अशी काही मित्रांनी तक्रारही केली होती. ती अगदीच चुकीची होती असें नाही. कारण एखादे स्थूल तत्व आपल्याला लवकर समजते. त्याची अंतर्गत रचना काहीशी गुंतागुंतीची असू शकते. ' Beeause the body as on organic whole is more easty to study than are cells of that body. (Karl Marx - Capital I ) आणि पहिल्याच दृष्टिक्षेपांत एखादी कलाकृती आपल्याला कळली नाही तरी हरकत नाही. दुसऱ्या प्रयत्नांत ती कळेल. आपण नादच सोडुन दिला तर तिच्यातील महत्वाचे आपल्यापर्यंत येणार नाही.

'If ever we manage even after relentless effort to penetrate in to the very essenee of a work by a single glance the objeet would be reduced to t's inert visibitity'

(Jean Paul Sartre. Essays in Aesthetics)

मराठीतील काही समकालीन कवितेचा अभ्यास करताना मला सार्त्रच्या वरील म्हणण्याची चांगलीच प्रचीती आली. त्या दृष्टीने माझ्या ' उंटाच्या पोटात पाणी देशी ' आणि ' त्यांनाही स्वातंत्र्य असू द्यावें ' या ओळीकडे रसिक वाचकाचे लक्ष विशेषत्वाने वेधू इच्छितो 'हे' ईश्वरा; वाळवंटांत तू उंटाच्याही पोटी पाणी देतोस; पण त्यासाठी उंटाचा सदोष वध करावा लागतो ' हा अर्थ वाचकापर्यंत गेला असेल तरच या अभंगाचे कार्य पूर्ण झालें असें मी समजेन. एरव्ही तो अभंग फसला आहे असे म्हणावयास काहीच हरकत नाही. तसेंच; ' त्यांनाही स्वातंत्र्य असू द्यावे ' म्हणजे शोषणाचेही स्वातंत्र्य असू द्यावे

असें नाही. ते स्वतःच्या पद्धतीने ज्या जीवनरहस्याचा शोध घेऊं इच्छितात तो त्यांना घेऊं द्यावा; असा अर्थ व्हावयास हवा. कारण मानवी मनाला अजूनही सांततेचाच अनुभव येतो आहे; आणि हजारो वर्षांच्या संस्कारामधून आलेली ती ' वेगळी तहान ' त्याला वेळी अवेळी त्रस्त करीत असते.

' मानवाच्या मनांत धर्मभावनेला एक विशेष स्थान आहे ही गोष्ट गृहित धरून या भावनेचा किंवा श्रद्धेचा गाभा शोधण्याचा प्रयत्न केला तर असे दिसते की मानव हा आपल्या अस्तित्वाचा विचार करीत असता आपल्या सांततेचा अनुभव घेतो. '

प्रा. दि. के. बेडकर
( प्रार्थना समाजांतील भाषण. )

माझ्या कवितेला समजून घेण्याच्या दृष्टिकोनातून ही दिशा सूचना मी करीत आहे. मराठीतील इतर कवितेप्रमाणेच मी माझ्याही कवितेकडे तटस्थ वृत्तीने पाहण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांत कुठे आत्मगौरवाची भाषा आली असेल तर ती माझ्या गफलतीने असें समजावें. मी माझ्या कवितेंतून ज्यावर उपहास व्यक्त करतो ती कुणी एक व्यक्ती नसून एक समाज प्रवृत्ती आहे. काही उत्साही टीकाकारांनी मागे मी एक जिवंत व्यक्ति रंगविल्याचे आस्वादक पद्धतीने लिहून मला संकटांत टाकले होते. म्हणून हा खुलासा येथे बुद्धया केलेला आहे. अभंगांतील तिसऱ्या चरणातील यमकाचा नियम प्रत्येक ठिकाणी पाळण्यांत आलेला नाही. तें चुकून झालेलें नाही हें येथे सांगणें आवश्यक आहे.

या संग्रहासाठी माझे चित्रकार आणि कवि मित्र श्री. नीलकांत ढोले यांनी चांगलेसें चित्र काढून दिलें. छायाचित्रकार मित्र श्री. ईब्राहीम डेव्हिड यांनी उत्तम छायाचित्र दिलें. श्री. अशोक ठाकरे; श्री. श्याम ठाकरे; श्री. हरिप्रसाद तिवारी आणि श्री. अशोक तांबुसकर या प्रेसमधील मित्रांनी अतिशय प्रेमाने आणि सुबकपणे छपाई करून दिली यां सर्व मित्रांचा मी शतशः ऋणी आहे. ज्यांच्या प्रेमळ सहकार्याशिवाय आणि हिंमतीशिवाय हा संग्रह निघणेंच शक्य नव्हते ते माझे परममित्र आणि सुनंदा प्रेसचे मालक श्री. शिवाजीराव पवार यांचे आभार न मानतां त्यांच्या मित्रप्रेमांतच राहणे मी पसंत करीन.

१ जून, १९७३ —वामन इंगळे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ९०२० वि: काव्य
क्रमांक २१२८ नोंद दि. ११/१२

## प्रतिज्ञा

माझ्या अनवाणी पायांची चाल
धिमी आहे.
कंकाला कात येत्रो
पण शिळावंत होणे नाही
अ:शापासाठी !

१८८५७ (स्थळ

## एक मधला माणूस

हातात हात मिळविले म्हणजे
(हाताचे धरून) ते कोटीकोटी होतात
मग मुंग्या मेरु गिळू शकतात.
दोन्ही ध्रुवावर कुठेही जा
या गणिताचे उत्तर वेदुनी चार.
(असली जरी मनेच अद्राव्य
पाण्यातील वाळूप्रमाणे आणि व्हाईस व्हर्सा.)
सूर्याखालील मुग्यामधली
अशीच एक मनूची शहाणी मुंगी
(मुंगळा आणि मुंगी या दोहोमधील
पंख कुटलेला तेलमुंगा.)
त्याच्या बुद्धीचा स्थितप्रज्ञ कॅटॅलिटिक एजंट
डोळ्यावर काडयांचा चष्मा लाऊन
खिळा माठतो आणि स्वतःच विचारांच्या
क्रूसावर जातो. (ते पुन्हा विचारासाठीच)
'अमुक अमुक हे तमुक तमुक आहे काय ?'
(अमुक तमुक हे कुठल्याही गहनाचे प्रतिनिधी.)
आणि तरीही जेव्हा चिमटीतून निसटणाऱ्या
अचपळ पाऱ्यावर क्रांतिशास्त्रे जन्मतात
तेव्हा लिहिणारेच बननात फॉल्स प्रॉफेट.
मधला कधीच 'बनविल्या' जात नाही.
(पुन्हा जन्मतो की 'बनतो हा वादच.)

मागाहून एखादी शेवरलेट आली म्हणजे
त्याच्या मनात आशा येते.
प्रॉव्हिडंट फंडात आपणही मोटार घेऊ.
पण बनीचे लग्न व्हायचे असते.
अशोक यंदा पोष्टग्रॅज्युएशनला जाणार असतो.
कुटुंबाच्या कॅंसरचे ऑपरेशन.
एक ना हजार. (पुन्हा रुपयाचे अवमूल्यन)
रस्त्यात चपलेचा अंगठा तुटला म्हणजे
त्या हातात घेऊन चालणे त्याला बरे दिसत नाही,
भोंग्याच्या आवाजावर धावणाऱ्या मजुराप्रमाणे.
असा हा (बीच मे मेरा. . . )

◇

हजार माणसांचा जुडगा बांधला म्हणजे
कुणा एकाकडेच न पाहता तो शिव्या देऊ शकतो.
(भ्रष्टाचारी–सत्तापिपासु.
ब्लॅकमार्केटियर अशा अर्थाच्या.)
पण जुडग्यातील एकेकटे नाना, काका, बाबा,
तात्या (हे सर्वसाहेब)
त्याच्या दृष्टीने कुणी उदार, कुणी त्यागमूर्ती, कुणी
देशभक्त असे असतात.
ही विसंगती त्याला बोचत नाही.

◇

वर्तनादर्शाचे एक पुस्तक असते.
त्यातील पाने चाळायची असली म्हणजे
त्यावर त्याला शिडी लाऊन जढावे लागते.

मग तो निर्धोकपणे सनावळ्या पाहू शकतो
(वधस्तंभ, चाकू, रिव्हॉल्वर आणि त्या त्या
मयतांची संगतवार नावे आणि पंचनामे.)
तरी त्याला भावाकुल होऊन चालत नाही.
तसा त्याला शापच आहे.
पुन्हा उःशापावर त्याचा विश्वास नाही.
(बायको गणपतीला गेली तर काही बिघडत नाही.
तिचे अणि आपले खाते कॉमन म्हणून.)

डार्विन म्हणाला होता
त्या पुस्तकात माकडांच्याच श्रेष्ठ पुर्वजांची नावे असतात,
पण मधल्याच्या मते
माणसेच मरून या पुस्तकात देव बनून येतात
(हा त्याने केलेला बावीस कॅरेट मध्य.)
त्याला भूक लागली म्हणजे
(त्याला भूकही लागते)
तो आपल्या मुलाच्या शोधात असतो.
(पुस्तकात यालाच ईश्वराचा शोध म्हणतात.)
पण गर्दीत बहुधा
त्याचा मुलगा त्याला सापडत नाही
मग तो मुलासाठी नैवेद्य अलग काढून ठेऊ शकतो.
(आणि खरे म्हणजे मग शास्त्रार्थ करावा लागत नाही.)

## युद्धकैदी

जीवनाचे संपूर्ण सत्य सापडूनही
तो तरुण विज्ञानी
प्रपितामह आर्किमिडिझप्रमाणे
युरेक्का म्हणून धावत सुटला नाही.
राहवले नाही म्हणून तो उद्गारला.
फक्त थ्यँक्यू.––यंत्रमेंदूला उद्देशून
कॉम्प्युटरने दिले त्याला मिश्रणाचे प्रमाण
अचूक म्हणून.
आविष्कार केला त्याने एका
नऊ डायमेंशनच्या ढळवळीत भाकरीचा.
तिला त्याने नाव दिले आहे
कंपलीट डायट प्लेट.
फोनोच्या प्लेटवर वाजते जसे संपूर्ण गाणे
तसे जीवनाचे सप्तसूर उमटणार आहे
तिच्यातून.
भाकरी नावाचे एक पूर्ण गोल सत्य.
विविधतेतील एकात्म्यासाठी
त्या सत्याचे आविष्कार तेवढे बदलतील.
डायमेंशन पहिले :– एक विशिष्ट घास घेताच
लागणार नाही भूक चार महिने.
दुसरे :– घावन मोतीचूर या सनातन
सत्यांचे स्वादगंध दरवळतील अंतरावरून.
तिसरे :– लंच टाईम मधील ऑरेंज आईसक्रीम
यांची खास व्यवस्था.

चौथे :– कॉकटेल. भूक वाढविणारे.
( सत्याने सत्य वाढविण्याची सोय )
पाचवे :– तुकडा मोडताच मेंदूतील आत्म्याची साधेल
मेंदू बाहेरच्या आत्म्याशी सायुज्यता.
सहावे :– केवळ लालोत्पादनाने मेंदूतील
सर्व भाषा कला केंद्रे होतील उद्दीपित.
आस्वाद निर्मिती दोन्ही होतील शक्य.
कालिदासाचा विरही यक्ष, तिरखवांचा पूरभ
गीतांजली आणि डोस्टोव्हस्की.
सातवे :– हिरव्या मिच्र्यांचा लसुणासह
ठेंचा आणि खरपूस भाजलेली भाकरी.
( कारभारणीच्या स्पर्शसंवेदनेसह )
आठवे :– उपोषणासाठी आवश्यक
असणारे संत्रा लिंबू सर्व रसप्रकार.
नऊवे :– षड्रसयुक्त एक समाधानी ढेकर
आणि लिंगदेह तन्मात्राकडे झेंपावणारी
एक उंच चर्चा.
नऊ डायमेंशनस् नऊ रसांच्या योग्यतेची.
परंतु एका नव्या वार्तेने
त्या तरुण शास्त्रज्ञाची उडाली आहे
अन्नावरून वासना.
या नव्या सत्याच्या वाटपाशी
असणार नाही म्हणतात त्याचा
आणि त्याच्या यंत्रमेंदूचाही संबंध.
भीष्माचार्यांप्रमाणे कौरवांकडून लढणाऱ्या
( आणि तरीही सत्प्रवृत्त )
अशा अर्ध्या मानवतेने त्याला करून टाकले आहे
युद्धकैदी.

युद्धासाठी भयंकर कारण शोधून
काढणारा या अर्थी
पण तो चिंतेत नाही फक्त एवढ्यासाठी.
इतिहासाची पुनरावृत्ती होतच
असते
सत्याला बळी जावेच लागते वगैरे वगैरे.
पण तरी त्याची चिंता वेगळीच आहे.
त्याला वाटते
आता शाळकरी मुलेही निबंध लिहू
लागतील
‘ भाकरी हा शाप आहे की वरदान ’

–०◇०–

## खय्याम

मला हवी असतेस तूं ( माझ्यासकट)
तुझंही जेवण झाल्यावरची.

तूं पदराला हात पुसत आलीस म्हणजे
त्याला असतो एक तृप्तजड हवाहवासा वास
चाकवताच्या डाळभाजींत कुस्करलेल्या
भाकरीसारखा.

मग माझाही खय्याम होणं अशक्य नसतं
कारण येतांना तूं घेऊन आलेली असतेस
तांब्याभांडं आणि सुंठ घातलेला दुधाचा
एक कप.

## आगाऊ आभार

परीक्षणनळीत सापडशील तेव्हा तुझी पूजा
प्लॅस्टिकचे पांच तांदुळदाणे आणि ताजमहाल गंध पावडरीचे
काही अणु.

तोवर हा काही वाईट नाही
झिरमिटसा संदिग्ध अंधःकार.
त्यांत तर्काचे गोटे भिर्कावतां येतात.
श्रद्धेचे अचुक लागतात (म्हणतात.)
शिकाऊ सैनिकाच्या फुसक्या गोळ्या बुजगावण्याला
लागतात. तसें.

(खरें खोटें परमेश्वरालाच ठाऊक.)
स्वतःचें आहेपण ठाऊक असणारा (असलाच) तर तूंच आहेस.
पुन्हा भक्तवत्सल.
म्हणून छप्पर फाडून दे काही दाणे माझें नांव असलेले.
कवितेसाठी शद्व एक. एक सदारंग गोरखकल्याण.
राघवसाठी फुग्यांचा एक कारखाना. पिना साड्या शिवसंभव
(की खटाव. अधिकची चौकशी आतून करतों.)
कोणत्या तोंडाने कसें किती मागावें असें एक तोंड.
हें सर्व माझ्यासाठी.
दुसऱ्यांसाठी एक चांगली लोकशाही
(प्रकारांविषयी इथे भांडणें फार)
कांही आक्रमणें (आपसी भांडणें हटकून मिटविण्यासाठी)
एक विश्वसंघराज्य (असंतुष्टासह तिकिट)
सत्यंकाकूच्या तिरळ्या बघीसाठी स्थळ (एक सामाजिक वास्तव)
आइसक्रीम . . . मोतीचूर . . .
हें असें घसरतें पहा. (यादी आधीच तयार हवी होती.)
तूं काल्पनिक असलास तर या याचनाहि काल्पनिकच

अगदी या कवितेसारख्याच. हा कागद कोरा आहे.
परीक्षणनळीत सापडशील तेव्हा पूजा.
(तोवर शरीर, विकार इत्यादी-रहितची जमेल तेवढी सवय सुरू.)
पण त्यापूर्वी हे आगाऊ आभार !

## प्रज्ञावंत

तसा तो प्रत्येकच शतकातून राहणारा एक चिरंजीव
( सांप्रती राहतो विसाव्या शतकात एवढेच )
पण सध्या तो पडून आहे युद्धछावणीत उभारलेल्या
रेडक्रॉस दवाखान्यातील बेडवर.
अवती भवती अद्यावत अग्नीबाणांचा वर्षाव. ( एक शरपंजर )
दोन्ही पक्षांजवळ असलेल्या मेगाटनी बॉंबचे तणावे
कुल्ल्या खाली हायड्रोजन – युरेनियम अस्त्रें
मान लोंबली त्याची म्हणून सच्छिष्याने बाण मारून करून दिली
एक मऊमऊ उशी ॲटम फॉर पीसची
(पुन्हा महायुद्धोत्तर युद्धाच्या तयारीसाठी पाठीशी जपून ठेवलेले एक धनुष्य)
शांततायन येईल अशा आशेवर ढकलीत आहे तो
आजची इच्छामारणे उद्यावर
गीताकार (अधिक गीतासीमांसाकार) यांनाही काही सुनावू शकेल
अशी त्याची 'शापादपि शरादपि' विश्लेषक प्रज्ञा
( पण तेवढी भाकरी हा त्याचा वुईक पॉइंट )
तिच्यासाठी लढला – लढतो लढणार आहे – तो युद्धे
पाच खाऊन दहाची भूक नित्य कायम असणाऱ्यांच्या बाजूने.
निदान – करू शकत नाही तो मालकाच्या तोंडावर एक स्पष्ट
'दुधका दुध और पानीका पानी'
वस्त्रहरण झाली म्हणजे बाळगतो तो एक मदिच्छापूर्ण मौन.
त्याचे सपूर्ण हात असतात आशीर्वादासाठी
कारण खाजगी आयुष्यात असतो तो
चारित्र्यवान. तत्त्वज्ञानी. सहिष्णु वगैरे

◇ ◇
◇

## प्रश्न

पान्हवणार असेल हिमालय
आणि शतकानंतर वाहणार असेल गंगा दूध भरून
आजच्याच तेवढ्या मरण-अस्तित्वांना नसावी साद
असे मनुष्यदेह सुलभ कधीपासून झालेत ?
मनुष्य मर्त्य. मीच कोण एवढा तिस्मारखाँ हें ठीक
पण मरणाआधी तूं तो हा ही हें मरतात त्याचें काय ?
अजूनही कॅन्सर क्षयाच्या ॲपेंडिसायटीस मधुमेहाच्या साथी
येत नाहीत. प्लेग मलेरिया कॉलरा यांनी तर कधीचेंच काळें केलें
मनुष्य मर्त्य म्हणून कुणाला तरी (कुणांना हे जास्त ठीक.)
मरणीं घालायचें
असें सामूहिक मरण इतकें अटळ कधीपासून झालें.
ज्यांची चिंता मला त्या पुष्कळांचें पुष्कळ बरें असतें.
त्यांची मला अपरोक्ष फिकीर हेंही त्यांना ठाऊक नसतें
कारण मी नसतों त्यांचा नेता
आणि वत्सल पिताही गांधीजींप्रमाणें.
पण तरी त्यांचे कल्लोळ
मनांत मी जिथवर एकट्याने जावें तिथवर येतात
माझा एकांत भंग करून माझ्या निःशस्त्र शस्त्रागारांतून ते
शस्त्रेंही कढून नेतात
अटळ असतो त्यांचा प्रवेश
जिथून बंदी घालावीशी वाटते तिथून माझ्या संताच शून्य
होतात. (अशक्य आंहे त्यांची शरीर आणि मानसिक प्रवेशबंदी.)
माझे एकाकीपण असें वेढून आहे
त्यांच्या जीवनमृत्यूचा वायर माझ्या नाडीशी जोडलेला
ते बिनाचेहऱ्याने तरी सुखीनाम जगतील मरतील
मी त्यांच्याखातर असा कोंदला कोंदटलेला.

पान्हवणार असेल हिमालय
आणि शतकानंतर वाहणार असेल गंगा दूध भरून
पण आजच तिने वहावें माझ्या अस्थिमज्जांसह
असे मनुष्यदेह सुलभ कधीपासून झालेत ?

-◇-

## माझे बाप !

माझे बाप ! तुम्हा इथे वाजे न का थंडी ?
नेसूच्या वस्त्रांची कशी लोंबलेली चिंधी
मीही कुणी समर्थसा नव्हे धनवान
पाय लांब पण माझे छोटो अंथरुण
पाहतो मी झोपलेले तुम्ही रस्त्यावर
पांघरूणाखाली मला माझे जागरण
मी हा रस्त्याकाठी आणि तुम्ही रस्त्यावर
पुढे दोन मार्ग पहा आहे पांगणार.
रस्त्यावर दोघेच कां कितीतरी लोक
तरी रस्त्यावर कुणी कसे नाही येत ?
देईन मी आर्शिवाद तोंड भरूनीया
दे गा देवा शक्ति यांना थंडी सहावया.

–○–

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमा
अनुक्रम 9020 दि: 
क्रमांक 2920 नोंद दि 11/92

## थकतील पाय म्हणुनी.

•

थकतील पाय म्हणुनी विकतो न आज हात
बुद्धयाच बांधलेले घर हे असे उन्हात
सर्वांस जे मिळावे ते तेच मांगतो मी
माझे नसे स्वताचे घर एक 'हस्तिदंत.'

ही स्वच्छ रोख भाषा तुम्हास कां रुतावी ?
या उंचशा कपाळी आठी कशास यावी ?
ज्यांना रुतावयाची मग्रूर ते गनीम
ही पाप पुण्यं त्यांची तुम्हास कां डसावी ?

अनुकूल देव धर्म त्यांना फितूर भाग्य
त्यांनी खरीदलेले हें तक्त आणि ताज
तुम्ही तयावरी गा बसता गणेश देव
अन् सांगता अम्हाला ते प्रेम आणि त्याग

तुमचा न नेम काही तुमचे गहाण सत्य
राहील का तरीही तुमचे अभंग तक्त ?
माझी मलाच चिंता तुम्ही रहा निःशंक
थकतील पाय म्हणुनी विकतो न आज हात.

## उलटी खूण–

चोरवटा ओरवटा – आम्हा नाही पूर
दोन्ही थडया ऊर – भरेचना
इंद्रायणी काठी – ग्रंथ हा कोरडा
म्हणून ओरडा – सत्यासाठी.

◇

## याचना–

खांचेसाठी डोळा
मागणें नाही रे
छत्र पापणीचें
देऊं नको.
खांचच येऊं दे
भरून अश्रुंनी
रेघ अंधत्वाची
मोडूं देई.

◇◇

## थोरवी–

मागूनिया नाही – दिधलीस भीक
दिली भीड मात्र – आगंतूक
केवढी थोरवी – तुझी ! वाळवंटी
उंटाच्याही पोटी – पाणी देशी !

◇◇◇

## रंग चढेल मेंदीला-

उन्हवेडें चैत्रव्रत
कशा घेतलें साजणी ?
तुझ्या तापल्या आकाशा
कशी येईल शिराणी ?
मृग यायचा अजून
—थेंब कस्तुरीचे त्याला !
ओल्या गंधांच्या टिंबानीं
रंग चढेल मेंदीला.

◇◇

## अर्धा माझा चांद -

एक माझी खोल दिठी
तींत सव्वा लक्ष वेणा
अर्धी मिटली नंतर
तुला मिठी मारताना.

क्षण गेलीस गुंगून
एकाएकी फसलीस
आणि फसली म्हणून
पुन्हा खोल रुतलीस.

एक माझी खोल दिठी
तींत अर्धा माझा चांद
चोर अमेच्या भीतिने
अर्धी जागती राखीन.

◇◇◇

## एकपण–

ती अजून स्मरते उदास सायंवेळ
मन मोहफुलांचा उबवित बसतें गंध
तूं उन्हकाजळी अथवा सायंछाया ?
पसरली जगावर विरक्त संध्याकाळ,

पर्णांची हिरवळ हिरवट झाली होती
पक्ष्यांचीं घरटी दूर राहिलीं होतीं
मेघांच्या ओल्या प्रकाशरेखांमध्यें
ती संधीधूसर पीडा भिजली होती.

वेगांत पसरली नीरवता भवतालीं
येतांना पाऊल निरखित होतें खालीं
पाऊल पूर्विचें माझें पुसलें नव्हतें
वाटेवर थिजली तप्त धूळ काटेरी.

ते विऊग जहाले ओठ निळ्या पानांचे
अंधार पसरवी काटे मूकपणाचे
तें उधाण आलें काळ्या जळनक्षींना
मी ऐकत बसलों गीतक एकपणाचें

## कविता

शब्दांचें जेव्हां जमतें सूत
यमकांना होतें घाई
अशा क्षणाला माझ्याजवळी
सांगायावें नसतें कांहीं

–००–

# राधा—

तूं जर नव्हती राधा तर मग
यमुनेवर कां वाट पाहिली ?
कशास लाडामधी येऊनी
नणदेची चुगली सांगितली ?

तूं जर नव्हती राधा तर मग
कशास आलीस पाणवठ्यावर
लगबगीत तू विसरून गेली
आणायचा घट खांद्यावर

मी तर नव्हतो कान्हा हेही
पुरते ठाऊक होते तुजला
होऊ नये तें झाल्यानंतर
ताक फुंकूनी पिणे कशाला ?

# कैकाडीन—

झोळीभर मूल – पोट वाढलेले
बोट सडलेले – माय तूझे
लांबून मी टाकी – स्पर्श टाळावया
पैसा एक नया – कुबेरलो.
तुझ्या वेदनेच्या – एकाच स्पर्शाने
उणीवांचे माझ्या – धन होते.
होतो पुनःपुन्हा – धनवंत असा
कर्जदार माझे – भाग्यवंत

## आगाऊ अभंग

विश्वैकात्म्यांचे वाढताती दर्प
ढेरी आणि कष्ट सवे वाढी.
ब्रम्हपुत्रा नेमे वर्षावात चढे
तशा सीमा वाढे इंच मैल.
भाकरही येथे तोंडास ना तोट
दोहोंची भेटच होत नाही.
दोन्ही हात वर झाले लोकमत
खाव्या आपोआप वर जाती.
जगा जगू द्या रे जगण्याच्या झुंजी
साऱ्या किलवंडी खालीपीली.
खेळे नायलॉन उलन पॅटीशी
टोके खोटी नाटी लाऊनीया.
तिच्या त्यांचे आहे ऑफीस खेळणे
कातडी चोळणे फ्रॉकाची गा.
एक होता म्हणे कुणी सॉक्रेटीस
माणूस म्हणून मर्त्य झाला.
मेजॉरिटी मर्त्य म्हणून माणसे
पीक भूसाचेच वधारले.

## आगाऊ अभंग

सारे सुखी होवो – प्रार्थना अनेक
देखली; कृतक – आणि आर्त.
ताळचाचे गणित – आले रोख ठोक
सुखी, कुणी एक – झाले नाही.
सुखी; त्याच्या होतो – मिलातच संप
'जळो सारे खंक – बोंबवंत.'
सुखी त्याचे येते – तिकीट धोक्यात
रिकाम्या खोक्यांत – चिंता भार.
असे दुःख त्याला – कौतुकाची सर्दी
कसे 'ट्रस्टी' वर्दी – लाभ.ती गा ?
ब्रह्मपुत्रा नेते – सर्वांचेच पीक
नेणते फरक – कोणताही.
देतानाही ती गा – सारखीच न्यायी
नेणते गा आई – नेतेपण.
टाळता न येते – टाळण्यासारखे
टाळकरी आम्ही – स्थितप्रज्ञ.
अटळाची आम्ही – बहु केली चिंता
आर्तक्याचा गुंता – अटळच.
शाश्वत सुखाचे – नेक आलंबन
त्यालाही वंदन – सर्वांचेच.
शाश्वत सुखाला – असो नसो अर्थ
त्यालाही स्वातंत्र्य – असू द्यावे.
असो नसो खात्री – शाश्वत सुखाची
हवीच शाश्वती – भाकरीची.
प्रार्थना देवोत – 'तसे' उंच सुख
मला माझी भूक – गोड लागे.

## आगाऊ अभंग–

सत्तेची अडगी
बिनवूड शंख
डिंक जसा काही
चिकटला १

स्वराज्याच्या पूर्वी
इमानी चाकरी
देई गे भाकरी
महाराणी २

माझी होती तेव्हा
चोख सावकारी
दारी अडलेले
भिकारडे. ३

आज उपटली
सेवेचीच गंगा
खादी अंगोपांगा
डकवली. ४

असा अवधूत
मी गा देशभक्त
सूक्त माझे एक
तिकिटाचे. ५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

विदर्भ येवो गा
अगा द्विभाषिक
महाराष्ट्र देश
तोही माझा. ६

प्रश्नासाठी माझा
नसे गा देह
भाव माझा देह
तर्जनीचा ७

कुणी जळो मरो
उरो हे तिकिट
माझी खटपट
इनटॅक्ट ८

०-०-०

## आगाऊ अभंग-

साधीसुधी अशी
सज्जन माणसे
पिसे देवत्वाची आम्ही दिली.

जे जे आचरीले
त्यांनी सहजच
उगाच त्याचीही ‘ सोय झाली. ’

पशूमुखे वेद
वदविले त्यांनी
आम्ही जाहीरात छान केली.

आम्ही केला अख्ख्या
माणसाचा शूद्र
बेट समुद्रात कोरडेच

बोडकाच गांधी
पंचा वीतभर
सोयीस्कर त्यांची ‘टोपी झाली.’

तुम्हीही व्हावेच
त्यांचीया सामान
नाही कुणी केली बळजोरी

सांडूनीया सीधी
आपुलाली वाट
भाट चापलूसी स्वीकारली

पुण्याचे गाठोडे
नाही मिळे बापा
पाप तेही गेले प्रामाणिक

पापी कोण आहे
कोण पुण्यवंत
शोधाला या अंत अगा नाही.

पण तरी नसो
जराही किल्मिष
आम्ही दंभदास वादातीत.

-◇◇-

## आगाऊ अभंग

अद्वैताच्या घरी...... भट सोवळयात
महाराचे मुख ....... मडक्यात
आठवा महिना ..... विध्वा संतिणीला
ग्रासतो संताला .... धातुक्षय
(सोडिती कुणाला ... काम क्रोध लोभ
दंभ त्यातूनही ...... शक्तिमात)
दगडाचा देव ........ माणसाचा भंगी
विधी माणूसच..... माणसाला
जेवणानंतर....... तांबुलाच्या सवे
त्याला काही हवे...... खुंटीजैसे
आत्मा परमात्मा ... लिंग देह नाडी
जोडी छंद ऐसा ... अज्ञाताचा
येथले दारिद्रय..... अन्यायाचे दुःख
चूप तेरी एक ....... सोयिस्कर
बोलायचे झाले..... तेही असे द्वयर्थी
समर्थाचा रोष .......नोढवे गा
निष्पन्नले नसो ...... काही वस्तुनिष्ठ
अनिष्ठ न काही......वेळ गेला
(वेळ गेला हेही..... आहे तसे खोटें
डॉक्टोरेट माझी.... संकल्पित)
बरे झाले तुक्या..... केलेस अभंग
चाली रंगदार .......लागताती

## वदंळ–

त्या रात्री मला भीती वाटली
अंधाराची आणि त्यातल्या
उजाड एकलेपणाची.
अंधारात उजाडताना पाहिल्या
काळ्या रात्रीच्या हलत्या छाया.
घेऊन गेल्या एकटेपणाला शैशवात
गजबजलेल्या घराच्या गोकुळात.
चांदण्या रात्रीची मधुधुंदी
पुन्हा छोटी पाऊले डोळलात टाकीत येते.
सांगतात पुन्हा कहाणी राजाराणीची
एका आवडतीची, दुसऱ्या नावडतीची
गुलबकावलीची कोऱ्या चंप्याच्या फुलांची.

जख्ख म्हातारे वात्सल्य
पसरीत आले पंखांचे गरमपण
हाक मारीत सुटते, धीर देते.
तोंडावरून हात फिरविते.

कण्हत सांगते, " बापा दिवाळीले
येजो गा मद्रासी तपकिरीची पुडी
माझ्यासाठी आनजो गा,
बरणी करवंदी लोणच्याची
गुळांबा श्रावणांतल्या 'बदाम्या' आंब्याच्या
विसरू नको जातानी न्यायले "
स्टेशने भुर्रकन उडून जातात.
निळे काळे पिवळे

दिव्यांचे खांब तरंगत जातात कुठेतरी.

येते एका धुंद
उमलत्या श्वासांची
गंधित रंगात्री
प्राणांचा जुगार
शपथ गळ्यांची

शाळूतील कापऱ्या मदिरेच्या द्रवाची
पदर पडदा बाजूला सारला
पाखरें उडून गेली आल्या दिशेने.
गाई पाण्यावर येऊन
गेल्या खुंट्याभवती हुंबरत हुंबरत.
उनाड जीवाची गेली बरसात
एका पोषाखी प्रौढतेत
मोडली माझ्या स्वप्नाची आरास
आता भीती वाटू लागली.
माझ्या मनातल्या एकलेपणाची
तुझ्या मनांतल्या एकलेपणाची
तुझ्या त्याच्या हिच्या तिच्या
आणि या सर्वांच्या
त्यांच्या त्यांच्या एकलेपणाची.
व्यापून राहिली एक विराट पोकळी.
अंधाराला एकाकीपण
त्यांतल्या काजव्यांना कावीळ
आणि इवल्या इवल्या प्रकाशजंतूंना
टी. बी. चा मेनंजायटीस.
त्याची इथली कारण परंपरा.

या सर्वांची भीति वाटते.
यांची भीति
या सर्वांना पुरून
माझ्यासाठी उरली आहे
यांची वेदना माझ्या
जाणीवेत एकवटली आहे
माझ्या एकाकीपणात
विराट वर्दळ आहे.

## बीजगणितांतील क्ष

माणसासारखें शरीर असलेला
अॅमीबाचा वंशज एक.
खऱ्याखोट्या कोणत्याही एका देशभक्ताप्रमाणे
खरखरीत त्याचे कपडे.
मुलें सांगतात पूर्वी तो चक्क सुभाषबाबूंप्रमाणे
दिसायचा. म्हातारपणीं कार्ल मार्क्ससारखा.
तो स्वत:सारखा कधीच दिसला नाही
(फक्त मरतांना तेवढा प्रेतासारखा दिसला.)
त्याला शिंक आली म्हणजे शिंकायचाही
पण तिचा कधी पेपरांत ब्लॉक आला नाही.
त्याला कामें असायची फार.
त्याला जें काम असेल तें झालेंच पाहिजे
असें तो म्हणाला, म्हणजे त्याचें आणि
(लोकांचेंही) काम झालें.
पुढे असा बावीस कॅरेट मध्य साधला जाईल
असें देव बोलून चुकला होता.
देव चुकून बोलला असेल तर तो खोटा
ज्योतिषी. (हेंही त्याला माहितच होतें.)
सदैव चिकटून राहण्याकडे टेंडन्सी
क्षयाच्या जंतूंप्रमाणें.
संयुक्त महाराष्ट्र. नागविदर्भ. द्विभाषिक. पंजाबीसुभा
व्यापारी मंडळें आणि मजूर आंदोलन.
प्रत्येक ठिकाणीं त्याची प्रार्थनीय उपस्थिती
निर्लेप तरी सर्वव्यापी परमेश्वराप्रमाणें.
(मुलें,'खांबातील ढेकणाप्रमाणे' म्हणतात हें वेगळें.)

कुणाची अडावी म्हैस
कुणाचें परमिट
एखाद्याची ॲडमिशन
तिसऱ्याची बोनस (अडअड. . .अडत नाही काय ?)
राष्ट्रीय चिंता या त्याच्या
(ह्याच्या सगळ्याच चिंता राष्ट्रीय : मुलें सांगतात.)
आणि म्हणून हें सर्व होनेकूच्य पायजेल.
त्याला नसावें माहित असें काय होतें ?
मुरारजींचा खोकला
विनोबा कुठला मध कसे खातात
स० कां० ची जांभई, मेननची मातृभाषा
गुपितें हीं सारीं त्याला आणि एकट्या परमेश्वराला
ठाऊक.
अलिकडे त्याचें पुष्कळ बरें होतें,
१९४७ पूर्वी नव्हतें असें.
नेमानें येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे
सालोसाल येत होतीं इलेक्शनें.
सभा सुरू होण्यापूर्वी भाषण करणारा
तो नेहमीचा ओपनिंग बॅटस्मन.
काल तो मेला.
मुलें सांगतात त्याने मुलांशिवाय
मागे ठेवलें नाही कर्जदेखील.
मागितलें नाही किंवा कुणी दिलें नाही,
हा उरला आहे विषय- इतिहाससंशोधनाचा.
त्याच्या पेटींत शिल्लक आहेत
न भरलेले फॉर्मस पोलिटिकल सफररचे
(ॲफिडिव्हिट न केलेले.)

★

## स्वातंत्र्य–

पगार येतो त्याचा अठ्ठ्यांयशी रुपये काही न. पैसे
( तो किती यावा एवढे एक सोडले)
तर तो खूपसा स्वतंत्र आहे.
कोबी की चाकवत ? मेथी की टमाटर ?
यामधून एका भाजीची निवडही त्याला करता येते.
नाही तर त्या कुठल्याशा देशात
रोज मुर्गी खायची सक्ति करतात
(असे त्याच्या किराणा शेठने त्याला सांगितले आहे.)
त्याचे तसे ठीक चालले आहे.
कारण दर महिन्याला त्याला पगार वाढीची मागणी-
करता येते
(आणि मुख्य म्हणजे वाढ न मिळाली तरी
तीच मागणी त्याला पुन्हा पुन्हा करता येते.
तरीही त्याला कोणीच दंडयाचा धाक वगैरे दाखवित
नाही.

सुख–

डोळ्यांना नेत्र नाही म्हटले
तरी आता भागते
आम्ही अनिवार्य नाहीत
नेमाने येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे
भांडी घासून रखरखित झालेले तिचे हात
( आता मला पाठ वेगळी खाजवावी लागत नाही. )
पाय पोटाशी घेतले म्हणजे
पांघरूनच उरते दशांगुळे
डोळ्यांना नेत्र नाही म्हटले
तरी आता भागते
नेत्रबिंदुची एखादी शिशी असली
म्हणजे हप्ताभर सारे कसे लख्ख दिसू लागते.

## वाट-

दूर गेल्यावरी
वळून पाहणे
उणे त्याने काही येत नाही
पुढचा मुक्काम
ठेवावा ध्यानांत
वाट चुकामुक होईलही
चुकल्या वाटांना
बरे न खोदणे
तेणे मुक्कामच दुरावेल
सापडण्यासाठी
वाटच चालावी
वळवावी वाट वाटेसाठी

–००–

## ते–

तगण्याशिवाय त्यांनी दुसरे न काही केले
मी पाहिले असे जे जगण्याशिवाय मेले.
सुसाट वादळाला यांची न साथ होती
अटळास टाळणारे होते तृतीयपंथी
यांच्या मुखात दात पण तेही हस्तिदंती
यांच्या नखात नव्हती इथली कधीच माती
भिंतीवरील शौर्य भिंतीच बांधणारे.।
पडसे समर्थ– श्वाना यांनाच शिक होती
त्यांच्याच वारुणीची यांना नशाही होती
बक्षात स्वार्थ. त्याच्या तर्काळ झाकपाकी
हृदये असून यांना नव्हती कधीच छाती
ते ना कधीच होते दर्यामधून गेले.

—◇—

## अट--

माझा दिवस येईल तेंव्हा
तूंही बदलशील बदलाच्या महायात्रेंत
आणि ठरवूनच तूं बदलला नाहीस
तर तुला जातां येईल एकांतातील उंच
तपश्चर्येसाठी तुझ्या आवडीच्या.
मात्र तुला पाहतां येणार नाही प्रियेच्या ठिकाणीं
पापाची मुळी आणि माणसाच्या ठिकाणी.
पायथ्याशी बसलेला चांडाळ किंवा
अंत्यज. जें दिसेल तेंच तुला पाहतां येईल
हीही एक तुझ्या स्वातंत्र्याला अट असेल. ••

## कौशी-धानी-एक रागचित्र (खाँसाहेब बडे गुलामअली)

फिक्कटशी चंद्र-निळाई
अस्तायी ठाय रुबायी
चापल्य फिरत मस्तानी
सम लंघुन ये चतुराई.
हिज मुक्ति लय बंधात
कंचुकी तंग अंगात
अदबीत हासते रुसते
ती रडतेही ढंगात.
तटतटली स्वरपीडेच्या
आमंत्रक सृजन बळाने
रक्तात मिसळती पेशी
रक्ताच्या ऋणबंधाने.
पतियाळी इष्क दिवाणी
उर लागट दर्द इमानी
ही स्वतात पिळवटलेली
'सबरंग'ची कौशी-धानी. ••

## कुठून ?

तूं कुठून येतोस ?
कुठून येतो तुझा स्टाईलीश कोट्
आणि त्याला शिवणारा तो टेलर ?
प्रेशर कुकर, मर्सिडिझ् बेंज्, टेबलावरील संगमरवरी
ताजमहाल, तुझी बॅड्मिंटन्ची रॅकेट, क्लबातील नाणेफेक
तुझी बिअर, तुझ्या अँग्लो-इन्डियन मैत्री
तुझी रसचर्चा, तुझी लाटरी... ?
तो लोखंडी पुल. तो. त्याची महारोगी वाकळ.
त्याची उपास सहन करणारी तितीक्षा
त्याची वाहणारी जखम...?

तो...?
त्याची सकाळची रामायणाची चौपाई
दुपारची तीन रुपये शेंकड्याची सावकारी
संध्याकाळी हनुमानजीची प्रार्थना
पारततांना शेठाणीसाठी आणलेली मदनमस्ताची वेणी...?

मी...?
मी कुठून येतो ?
माझे नास्तिक्य ? आणि त्यांचें आस्तिक्य ?
त्यांचा विराग ? माझा वैराग ?
कुठून येतो भक्त ? कुठून परमेश्वर ?
कुठून येतो मी ?
ही जळती लेखणी ?
आणि हा कागद कुठून येतो ?

# एक धुन- उगम राग चित्र
(कुमार गंधर्व)

मी का रमतो मातीत
स्वप्नातही का मग कळते
ही ॐ कराची रुपे
की मत्रु कुंभाराने
जड चैतन्याचे भेद
क्षिप्रेची जांभुळवाली
ती आली कोठून तिजला
हे प्रश्नच ठाय मचूळ
तिज जायचे घाईत
तो शूर सिपाई 'बन्ना'
श्रावण मग येईल रात्री
जामुन मग भिजतील ओठी
ही लवलव अंगागात
सांताची स्खलनी माती

घुसमटतो जीव तिच्यात
की स्वप्न फक्त पृथ्वीस
तर का नाही मज आर्ती ?
वळल्या या साऱ्या मूर्ती ?
का बद्द वाजती नाणी ?
गा कोण रमा, रहचमानी ?
जायाचे कवण प्रदेशी ?
तिज नाते बोर बनाशी.
येणार आज घरवाला
जयजयजय जवानवाला.
त्या फुटतील नग्न धुमारे
जंगल मे मंगल सारे.
तनु तिची जाहली तंद्रा
रे बनते योजनगंधा

# पाकिटमार

अयोनी संभवाचा अपवाद वगळला तर
असतात शेहेचाळीस क्रोमोसोम्स
सुर्याखालील जन्म देणाऱ्या प्रत्येक नरमादीत
घडते एक विद्युन्मय विकारविलसित
सात मजली हवेलीत – अंधेऱ्या चाळीतील कुबट घरात
मधुचंद्रगृहात – कुठेही.
असतात क्रोमोसोम्स मात्र शेहेचाळीसच.
विविधतेला एक साधारण सत्याचा सार्वत्रिक छेद
जसा सूर्याचा चंद्रप्रकाश हाताने झाकला जातो आणि
झाकला जातही नाही.
(म्हातारीने कोंबडा झाकला तरी उगवायचा रहात नाही )
तसे क्रोमोसोम्स एक उघडे नागडे गुपित.
    परिस्थिती माणसं जन्माला घालते पण तीही
    प्रत्येकच अंड्यातून जन्माला घालीत नाही
    मार्क्स डांटे आणि अ‍ॅर्किमिडिझ,
    वाकविल्या ज्यांनी क्रोमोसोम्सच्याही अनुवंशीय
    शक्यता आणि पूर्वसंचितांच्या खिडक्यांचे गज
    तर जागच्या जागीच वितळले मेणासारखे.
    जगता आले ज्यांना पृथ्वीवर
    (दुसऱ्या ग्रहावरून न येताच)
    ग्रहावरून आल्यासारखे.
प्रत्येकच अंड्याचे होते तसे तर
वासुदेव मुझफर (आणि अशाच बहुत)
नामे असून निनावी असणाऱ्या इसमांनीही लिहले असते
दास कॅपिटल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर,
क्रमांक C.f.2.2.8... दि ........

उदा० वासुदेवने धुतल्या नसत्या उष्टचा बशा
धि हिंदु मटन प्लेट नामे टिनपाट हॉटेलात.
तुकारामही मग बोलला असता थिअरी ऑफ रिलेटिव्हिटीच्या
आकडेमोडीत. त्याने शुद्ध निर्मळ अंड्यांच्या दुकानाला ठोकला असता टाळा
आणि लावला असता मुझफरने शुद्ध निरामय
तारषडज् अब्दुल करीमांच्या ' किराण्या ' चा
( सध्या तो कव्वालीत टाळया वाजविण्याचे काम करतो. )
होते असे तर प्लेटोची सारी वंशावळ
बसली असती राज्यकर्त्यां खुर्चीवर
(आणि ' राज्य ' केले नसते. )
नसते जन्मले घाणे. त्या भवती फिरणारे
आणि खांद्यावर क्रूस घेऊन ( शिवाय )
हातांनी चाबुक फटकावणारे.
वासुदेवाचा जन्म झाला त्या रात्री
सटवाई त्याच्या कवटीवर भाग्य कोरताना त्याला म्हणाली,
पूर्व पुण्याईने तू होशील ब्राह्मण
पण वाचायचा नाहीस पोथी. धुशील मटनाच्या प्लेटी.
' गुणकर्म विभागशः ' देखिल तुला म्लेंछ करू शकणार नाही.
तुकारामाला ती म्हणाली तू होशील खाटिक
पण घासशील खर्डी एखाद्या सट्टेवाल्याच्या ऑफिसात.
परंतु ' गुणकर्म विभागशः ' तुझीही जात बदलणार नाही·
मुझफर होता जन्मायचा मुसलमान म्हणून
पण त्याच्या क्रोमोसोम्सनी आधीच धर्मांतर केले होते
म्हणून त्याचा एडवर्ड मुझफ्फर झाला आणि सटवाईचा
नाईलाज झाला. (पण तिने जिंदाबादच्या बेगमेला आणि
आकाशातल्या बापाच्या लेडी सेक्रेटरीला डेप्यूट केले)
आधी (सटवाईने) सांगितले मग या मंडळींनी केले.

परंतु सटवाईच्या वेंचने सांगितला होता एक अपवादही.
जर तुम्हाला रस्त्यात बोळात घरात बँकांत
( आणि जळी स्थळी काष्ठी पाषाणी )
दिनार मुद्रा नोटांदि चलन भरलेली पाकिटे सापडली
तर आमचा भाग्य लेख
( एखाद्या निरुपद्रवी कायद्याप्रमाणे )
कॅंसल समजण्यात यावा.
येथून तुम्ही अडथळा अटकाव विहित वातावरणात प्रवेश कराल.
मग तुम्ही राज्यासकट राज्यकर्ते
शास्त्रांसह कलानैपुण्यें
सशरीर आणि लूपबंद कामिनी (क्रोमोसोम्सनाही चकमा )
डांटे मार्क्स प्लेटो ही मंडळी त्याच्या घरादारांसह
विकत घेंऊ शकाल.
शिकागो, एडन तें रिओडिजानिरो आणि ओमस्क ते कन्याकुमारी
कुठेकुठेच तुमच्या पुरुषार्थाला अटकाव असणार नाही.
' गुणकर्म विभागशः ' तुमची जात बदलण्याचा प्रश्नच येणार नाही.
(इतकेच काय) जातिवंत जातिवादी देखिल तुमची जात
तपासणार नाहीत.
ते तुमच्याकडे पाहुन न पाहिल्यासारखे करतील.
स्वप्नात झालेल्या गतजन्मीच्या दृष्टांतासारखा हा अपवाद
(तेवढा) वासुदेव मुझफ्फरच्या स्मरणात ताजा आहे.
नियमाची सिद्धी मिळविण्यासाठी म्हणूनच
ते आपल्या बालपणापासून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या
(रिकाम्या) पाकिटांकडेही आशाळभूत नजरेने पाहात
असतात.

◇◊◇

## आगाऊ अभंग–

शेवरलेट त्यांची
तुला फक्त लिफ्ट
कष्ट चालण्याचे बाघू नये
त्यांचा फोनोग्राफ
सुंदरच तान
कान आपलाच असूं द्यावा
काहीच न देता
दिल्याची जाणीव
पाळीव ओझ्यांना वाहूं नयें
ठायी ठायी कधी
पिचू नये प्राण
थान हिजड्यांचा पिऊं नयें

•••

## दिशा-

मी त्याला म्हणालो
तू पूर्वेकडे जा
इथून दोन कोसावर
तुला एक वेळूबन दिसेल
त्याला पश्चिम अंगाने वळसा घालून
पुढे जा
समोर पळसफुलांनी डवरलेल्या
झाडाखाली तुला ती दिसेल
तू तिला भेट.
तो गेल्यावर मी लाकडं फोडीत राहिलो.
संध्याकाळी तो परत आला.
मी विचारले 'भेट झाली'
म्हणाला 'हो' त्याचा स्वर गरम होता.
न राहवून तो पुन्हा बोलला
'पण तू दिलेली दिशा चुकीची होती'
'कशी'?
'तू म्हणाला वेळूबनात पश्चिम अंगाने जा'
'बरं मग ?'
'पश्चिम अंगानं झाड दिसलंच नाही'
'मग?'
'म्हणून दक्षिण अंगानं गेलो'
'तुझं काम झालं ना ?'
'पण तुझी दिशा चुकीची होती'
'तू तुझ्या सोयीप्रमाणे तेव्हा मार्गबदल केलास ना ?'
'हो'

'मग?'
'पण तुझी दिशा चुकीची होती'
मी पुन्हा काही बोललो नाही.
फक्त लाकडं फोडीत राहिलो.

-◇-

## शोध-

मी सतत शोधतो आहे
ती मेलेली माणसे
त्यानी जिवंत केलेली
तीच माणसे पुन्हा मरूनही गेल्याचे
कळले आहे
( त्यांच्या आत्म्याना पुन्हा शांतता लाभो )

## दर्शन-

तूं जाऊन ये देवळाच्या गाभाऱ्यात
तेथे तुला तुझा ईश्वर भेटला तर मला कळव
तोपर्यंत पाहतो मी
देऊळाच्या पाठीवरील हे संभोग शिल्प.

## सहा चिंतने-

१.

कुणी विनोबा, कुणी तुकोबा, कुणी चोखोबा
तसाच मी एक झोलबा
( कानतुटक्या चिरकुटचाचा बा )
राहतो वेशीवर एका सरमडाच्या झोपडीत.
गावात राष्ट्रीकरन झालं म्हून आईकतो.
गांधीबाबानं आनखीन भीमरावबाबानं म्हारकीला
गावाबाहेर हाकललं असंही ऐकतो.
म्होरल्या मंगयवारी बाजाराला जाचंच आहे मना. . .

२.

तूपात म्हैस पडली तेव्हा तिला चाटणाऱ्या
बुलाकीमल भाईजीनं शाळेला वीस हजार रुपये दिले
म्हणून त्यांची मुलाखात घेऊ म्हणतोस ?
ठीक. माझे प्रश्न असे
बहिऱ्याला आमरण अध्यक्षपद कशाला गा ?
किती मास्तरडे हाकलले ? किती चपराशांना
सोडचिठ्ठी दिली ? भाईजी एकदम किती जागांवर
बसतात ? किती सोडून दिल्या ?
शाळेची झाली सावकारी शिक्षण घरची खेती
चोरीसाठी शोधतो की नव्या नव्या रीती ?
( याला दोहा चौपाई म्हण हवं तर )
तुपात म्हैस पडली तेव्हा तिला चाटणाऱ्यानं
सुरू केलं आहे नव चाटणं पांढऱ्या हत्तींना.

३.

नाही गा हा प्रश्न फक्त स्वच्छतेचाच.
उकंड्याची बय जायची देशमुखाच्या वाड्यात
सुईण म्हणून बाळंतपण करण्यासाठी
उकंड्याच्या आज्जीच्या गळ्याशपथ सांगतो,
एका डोळ्यानं कान्ह्या असलेल्या आणि
नेसूच्या धिधोट्या झालेल्या तेव्हाच्या 'पंचेफुलाला'
देशमुख चक्क अंतर्गृहात घेऊन जायचा.

४.

कुठून आली ही मिठाई
तुला आणि मला दोघांनाही ठाऊक नाही
पण मिठाई आहे.....
आणि तूही मानशील की ती खूप गोडही आहे.

५.

नुसत्याच उत्कटतेनं, बेफामपणानं सांगायचा प्रश्न
नाही गा...
शिवाशिवी, वेश्याव्यवसाय हे सारं आवश्यक
आहे हेही 'खरेपणानं' सांगितलं गेल आहे.
खोटही उत्कटतेनं सांगता येईल...भ्रमात
राहू नकोस

६.

मी स्कॉलरशिपांवर शिकतो म्हणून तू मला
सरकारी जवाई म्हणतोस
तू जावई व्हाला तयार आहेस ?
पण त्यासाठी तुला अस्पृश्यत्व घ्यावं लागेल
कबूल ? आणि घेतल्यानंही जुळणार नाही
आमच्या ‘ जातीत ’ जन्मावं लागेल
मित्रा प्रश्न जुने होतात पण जुनं होणं म्हणजे
सुटणं नव्हे.

दुकान--

समस्त स्पष्ट स्फटिक आदिम प्रकाशाच्या मध्यभागीं
ब्रह्मांडांच्या आरंभ बिंदूच्या टेंचात बसलेले
एक अंधाराचे बेट. त्यावरील एक दुकान
दुकानावर एक जाहिरात.
येथे शुद्ध अंधार छानून ( म्हणजे अधिक अंधारून )
मिळेल.
अंधाराची नक्षी, अंधारासाठीचे वैराग्य व्रते उपास;
त्यासाठीचे मनसुबे ( आणि एक समग्र शास्त्र )
येथे मिळेल.
कुणी रेडीमेड अंधार आयताच आणला.
तर त्याचे दागिने करून मिळतील.
( येथे बावीस कॅरेटला मज्जाव आहे. )
देशी-परदेशी ओला-सुका एअर कंडिशन अंधार
प्रकाश येऊ नये याची सारी खबरदारी घेतली आहे
प्रकाशाशिवाय अंधारात दिसणार नाही म्हणून
येथेआम्ही पाळले आहेत काही काजवे.
आता तेच सूर्यप्रकाशावर पोसले जात असतील तर
त्याला काळ्या फर्मचाही नाईलाज आहे. सचोटी हेंच
आमच्या दुकानाचेही भांडवल आहे.

## दोन एकांत–

### ( पहिला )

स्नानाच्या उद्देशानं तो कोंडून घेतो स्वतःला
दिवे असून बुद्ध्या अंधार केलेल्या न्हाणींत.
दाराची खिटी; खिडकीची पाटी संपूर्ण देतो
बंद करून.
कढत पाण्यात ओततो थंड पाणी
जोरानं उघडतो सच्छिद्र साबुणदाणी
आणि शर्टाचे आणि खालचे एकेक बटन.
जांभळ्या वांग्या रंगाचे खरखरीत पोट.
त्यावरील भुरकट शेरणीचे डाग
पाठीच्या पन्हळीतील खाज. त्याच्या ओळखीचे
एक संपूर्ण शरीर भितीही भोगण्याची क्षमता
बाळगणारे
एकेक अवयव होतो सचैल स्वच्छ
पण अनुभवास येतो त्याच्या निराकार अंधार.
असमाधानाच्या नाकावर बसलेली पुन्हा पुन्हाची
माशी.
तो दुसऱ्या कुणालाच घेत नाही आत
त्याला हवा असतो संपूर्ण एकांत
एकांत आणि त्यानंतर नशा.
चालले आहे त्याचे महास्नान
कधीपासून.

( दुसरा )

अब्दुल हलीम जाफरांचा सतारीवरील संपतो आहे
मारवा
आणि त्याच्या शरीराला चाटू लागतात मंद मंद
ज्वाळा
आभास
पण या भासाला कां आहे माणसांचाच वास ?
तारांकित नरम लाकडात इतकं दुःख यावं ?
म्हणजे माणसानं माणसापलीकडे जाऊन जाऊ नये
तसं हे लाकूडही जात नाही माणसापल्याड.
काल नव्यानं भिक्षा मागणारा ग्रामीण सनईकार
असाच एक माणूस.
भीक मागतानाही कोशाचा शेमला बांधलेला
(पण प्रत्यक्ष न मरताच भूकबळी झालेला. )
तेलकट कागद चाटणारी अंबिकेच्या देऊळाजवळील
वेडी.
तिची जाणीव असेल दुभंगली पण अभंगाची
जाणीव कां हलते ?
तिच्यासाठी एक स्वरपुंजका. त्याच्यासाठी एक
थेंब स्वतःसाठी एक सम. त्याच्यासाठी
एक द्वंद्व. सर्वांसासाठी एक–प्रवेशी महाद्वार.
अब्दुल हलीम जाफरांचा सतारीवरील संपतो
आहे मारवा.

लक्षणे–

जेंव्हा वाटते प्यावीशी सारी दुनिया
एकाच दुर्निवार घोटात
दिसू लागतो दुसरा पूरक घोटही अप्रागतिक
जेंव्हां; फक्त उंचीतच वाढलेल्या भोंग्याला
दिसू लागतात हाडामासांची माणसं ठेंगणी
आणि तिरस्करणीय;
सिध्यासाध्या विचाराची स्वतःच एक अमानुष
पीडा होऊ लागते
आणि शोधू लागते ती योगायोगाने
आडव्या गेलेल्या मांजरीत एक पूर्वनियोजित
हेतु (करून चेहरा करुण–गंभीर–सारे
कळले आहे अशा अर्थाचा)
जेंव्हा वाटते दुनिया प्याविशी एकाच दुर्निवार
घोटात (आणि तरीही तीही न पिताच;
राहतो फक्तच सीप करीत व्हिस्की)
तेव्हा दोन्ही डोळ्यांतील मोतिया बिंदू
टर्र झालेल्या जांभळासारखे पिकले आहेत
असे खुशाल समजावे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक: ८१०२० विभाग काव्य
२९२६ ११।८२

## अगाऊ अभंग --

आपले परके
पाखडण्यासाठी
सूप थोर गाठी लागते ना
गाठी असो ' मला
वाटल्याचे ' शस्त्र
शास्त्रे मागाहून जन्मताती
नाकारावे हळू
त्याचे त्याला मीठ
पीठे कालांतरे वसताती
रक्त न ये ऐशी
मारावी गा सुरी
हिंसेलाही घरी नसो थारा

◇◇

## सल

काही जरी झाले तरी दुःख त्याचे नाही
दुःखासाठी दुःख अशी ऐट माझी नाही
लिबातळी भेट तुला लिबोणीची लाज
उगीचच आढेवेढे नाकाराचा साज
गळ्याचीच आण तीही गळ्यातच अडे
सांगितल्यावाचूनही अव्यक्त सापडे
तूही तुझ्या संसारांत न्हाशी आनंदात
मीही सुखी आज गोड माझ्या संसारात
काही जरी झाले तरी दुःख त्याचे नाही
तुझ्याविना सुखी याचा सल ठायीठायी.

◇◊◇

## चक्रधून - एक रागचित्र
(उ. अब्दुल हलीम जाफरसाहेब. )

जाऊन जाऊन मनांत किती खोल
कुठवर आणि कुठें जायचे ?
दूर मुसंडी मारली तरी
शरीराला आणि मनाला असत नाही
एखादे असे छिद्र
ज्यांतून चक्क आरपार... पलिकडचे
पाहता येईल
गड्या, पलिकडे पहायचा हा पुस्तकी
चाळा सोड
येथे तर प्रत्येकच 'प्रतिध्वनि'त
गवसतो मीच स्वतःला पुन्हा पुन्हा
नवा झालेला, सर्वांतला
निबिड एकांततांतही सर्वांतला
हें सर्वांतील सर्वांनो
मी पुन्हा पुन्हा तुमच्यांतच येतो
दाऊदांनी बांधलल्या अनिवार्य
सभेसारखा.
तुमचाच मी तुम्हाला भेटतो आहे
चक्र-वळणी वळणावर
मुक्कामा मुक्कामावर
आणि विरघळवून टाकतो
चेहऱ्या चेहऱ्यावरील सनातन अंधार
एका चिद्भरल्या आमुलाग्र
'खेंचीमध्ये'

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ९८१५१
मुंबई शाखा

ढवळी वरी विजार
तुर्की ' निळी ' तुमान
आश्वासनांत ' कल्पी '
थिजली पहा रुझान,
पंक्तीत वाढप्यांचे
फुटलें भुकाळ पेव
झारा पळीच बनले
' अतिथी महान देव '
वाढून ठेवलेलें
त्यांनी असेंच पान
लाचार खाय त्याचा
हुकमी असो सलाम
घडणार थोर होते
घडले नसेल कांही
पिकते ' सटीप ' पोळी
थोडे नसेंच हेंही.

-◇◇-

## जगणे जो जगतो त्याचे

शुन्यावर शून्ये चढली

फक्त शून्य रास
जगणे जो जगतो त्याचे
शेज फक्त श्वास.

नसे चंद्रभागा त्याची
नसे ब्रह्म-साथ
सहारात धाऊन जाते
तीच त्याची माय

सैरभैर स्वप्नामध्ये
असू नये भित
स्वप्न ज्यास पडते तो गा
हाच भूप्रदेश.

हात बांधणारांसाठी
भुंकवी न तोंड
स्वतःलाच विसरायाची
पडू नये भीड.

जिथे जिथे ऐकू येते
गुंज आणि कुंथ
तिथे तिचे स्वर हे लागो
भाबडे निःशंक.

दुःख डोंगराच्या चणीचे
असो पायथ्यास
सूर्य असो डोक्यावरती
शेष सर्व ठीक.

श्रमजीवि–

दुसरीकडे, तुम्हाला न सावडणारे
तुमचे वेगळेपण
त्याला जोजवणाऱ्या धुंद सिफनी
बहिर्दिशेलां जातानाही न सुटणारी तुमची पोझिशनची
अदब. दुसरे काही जग संभऊ शकेलायची शंका
नसणारी तुमची सिनिकल आत्मतुष्ठा
कुंपणावर बसणारे तुमचे पिन पॉईन्ट मतभेद
या सर्वांचा उपयोग फक्तच त्याला जमीनीत
गाडण्यास करणार असाल तर खबरदार
तो तुम्हाला पुरवितो खुर्ची
आणि तरी नाही तो एखादा कॉट्रॅक्टर
पुरवितो तो तुमच्या तोंडाना राजहंसाचा चारा
आणि तुमच्या अश्लील ढुंगणांना महावस्त्र
( आणि तरी तो परमेश्वर नाही )
तो एक साधासुधा श्रम करणारा आहे.
त्याच्या पाठीवरील वळ मीं पाहिलें आहेत.

## पूरिया धनाश्री : भीमसेन जोशी

ती सकाळ अन् दुपार कर्मबद्ध चाळा
कार्यभार उतरत ये सहज सांजवेळा
क्षितिजावर थबकुनिया धूलीसह अल्लद ये
गायींच्या घटांतून मंद्र नाद भोळा

ती सकाळ अन् दुपार कर्मबद्ध चाळा
कार्यभार उतरत ये सहज सांजवेळा

गुप्त ऊन्ह दिवसाचें रात्रप्रहर अजुन दुर
धूळीवर उठलेले स्पष्ट गोल वृषभ-खूर
पक्ष्यांनी परताया पंख-शिडें वल्हविलीं
आकाशीं घुसमटतो संथ-शीळ वाळा

ती सकाळ अन् दुपार कर्मबद्ध चाळा
कार्यभार उतरत ये सहज सांजवेळा

परततो खळयांत स्वस्थ-चित्त कृषक श्रमिक तो
शिणलेलें गात्र विसवण्यास चरण भिजवितो
खुणवि त्यास झाडींतुन वाडीचा गाव-दिवा
घरधनीण आणि तिचातो घुंगुर-लडिवाळा

ती सकाळ अन् दुपार कर्मबद्ध चाळा
कार्यभार उतरत ये सहज सांजवेळा

सगुण बिंब चतुर रंग कुंदशी हवाई
कंठाशी ओल. तरी घडत कांही नाही
सूर्याचेंही येतें अवचितसें भरून ऊर
विपदांशी झुजुनीया जो सदा निराळा

ती सकाळ अन् दुपार कर्मबद्ध चाळा
कार्यभार उतरत ये सहज सांजवेळा

# कॅबेरा

वांध्याच्या हॉटेलपासून चरडेच्या सिमेंटच्या ओटचापर्यंत ती फिरायची
रात्रीची पायांची मुटकुळं करून झोंपायची.
थुलथुलीत पोट. कडक चहाचं आधण ओतून जळलेल्या शिसवी
खांबासारख्या मांड्या. कमरेवरील गजकर्णाचे डाग,
जखमाळलेली योनी, ढुंगणाला रुपयाच्या आकाराचें चट्टे.
तिच्या नग्नतेची तिला लाज नव्हती. लग्नापूर्वीच वेडी झाली
असल्याने आंबट शौकिनांना टवटकी लावावययास लावील अशी
तिची ठाशीव ताशीव स्तनें. ‘ हिचा प्रश्न सुटला तरी समाजाचा
थोडाच सुटणार आहें ?’ अशा पुस्तकी खोड्यांत न अडकलेला
वांध्या तिला कफनी शिऊन द्यायचा. वाघीलचा वामन तिला
आईसफ्रूटची कांडी घेऊन द्यावयाचा. जब्बार तिला विडी देऊन
ती पेटऊनही द्यायचा. वेडेपणांतही एक आंध्री अवधान !
बाकीच्या वेळांत ती देऊळाच्या पायरीवर झोपण्यास,
उष्टया पत्रावळी व तेलकट कागद चाटण्यास स्वतंत्र होती.
सट्टयाच्या व्यापाऱ्यांना तिच्या हावभावांतून पाहिजे तो अर्थ
समजण्याचेही स्वातंत्र्य होते.

काल काही केल्या ती झोपूनच उठली नाही; सूर्य वराच वर आला
तरी. पोराटोरांचा घोळका. माशांचा थवा. जुन्या काळच्या पैशांच्या
कसणी सारखे आवळलेले तोंड. रक्ताळलेले ढुंगण आणि
किटकलेली योनी. मला आठवली माझी आई
आणि तिच्या आठवणीच्या कुशींत मी माझी मान घुसळली.

## ठाऊक की–

ठाऊक की धुक्याचे जग राहणार नाही
बळवंत त्याज मेवा हे चालणार नाही
उठतील हात जेंव्हा श्रमवंत झडझडून
हें आजचे उद्याला मग राहणार नाही.
ठाऊक की मलाही मी राहणार नाही
शंका नसेंच माझ्या हिरव्या मनांत काही
झालो निश्चिंत. तरीही ठाऊक हें मला की
माझी कुळें पुढेही मरणार मात्र नाही.

## किरण -

होऊं दिला तर्क फक्तच कुऱ्हाड तर होतोही
माणसासाठीच्या तर्कांतूनच काही श्रेय हाताशीही आले.
काही नाकारले काही स्वीकारलें काही ओठंगून राहिले
साधु आणि सिनिक अव्हेरून काही किरण मिळालें.
ते आले चिंतितशा मलूल डोळयांतून
त्यांची बाजु घेताना कधी नाही आजुबाजुला पाहिलें.
व्यक्त होऊं दिला हुंदका तर होतोही
पण तेवढ्याने काय झालें.
सोप्यासोप्या दुःखांना जिरऊन काही पुढे जाणें आलें.

REFBK-0018851
REFBK-0018851
मराठी ग्रंथ संग्रहालय
९८८५९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. (स्थळ प्रत)
६९०२०

## वामन इंगळे यांची इतर पुस्तकें

१) काळा समुद्र (कादंबरी)

२) अजून येतो वास फुलांना (कादंबरी)

३) शब्द आणि सूर (साहित्यसंगीत विषयक समीक्षा)

४) मायबाप (कथा संग्रह)

५) कानसेनाची तान (संगीत विषयक ललित लेखन.)

६) आशा (कथा संग्रह)

७) दलितवाङ्मय आणि दलित चळवळ वैचारिक प्रबंध (संकलिपत)



## वामन इंगळे

जन्म :– २१-६-१

काटोल, जि. नागपूर.

इंगळयांची कविता सामाजिक जाणीवेचा वसा घेतलेल्या कवितेच्या एका अर्थशाली वळणावर उभी आहे. जीवनाचे उन्मेष ताकदीने अभिव्यक्त करूनही ती सांकेतिक किरटी आणि ठोकळेबाज झालेली नाही हे तिचे यश मोठे आहे.

त्यांच्या इतर साहित्याला – किर्लोस्कर कथास्पर्धेचे बक्षिस व
म हा रा ष्ट्र रा ज्य पु र स्का र. (कथासंग्रह.)
आदि पुरस्कार मिळालेलें आहेत.

इंडियन कौंसिल फॉर कल्चरल रिलेशन्स या संस्थेतर्फे यांच्या [redacted]तांचा अनुवाद - होतो आहे. लिटररी गिल्ड ऑफ इंडिया व एम. ए. [redacted]द्वारे यशपाल, ख्वाजा अहमद अब्बास, व्यंकटेश माडगूळकर आदि [redacted]त इंगळयांचे साहित्य सर्व परदेशी भाषांमधून अनुवादित होत